**प्रेसनोट दिनांक १२/०७/२०१९.**

**दत्तवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर.**

**“तीन वर्षापासुन गुन्हयामध्ये पाहीजे असलेल्या आरोपीला दत्तवाडी पोलीसांनी केली अटक”**

मा.पोलीस आयुक्त सो, पुणे शहर डॉ.श्री.के. व्यंकटेशम् यांनी पुणे पोलीस दलामध्ये अमुलाग्र बदल घडवुन आणुन समाजाच्या तसेच नागरीकांच्या उपयोगी येणा-या असे विविध उपक्रम राबवत आहेत. त्याचा फायदा पुणे पोलीसां मध्ये येऊ लागलेला आहे. त्यामध्ये जेष्ठ नागरीक, महिला व मुलांसाठी**‘भरोसा सेल’**, रेकॉर्डवरील आरोपींना चेक करण्यासाठी**‘क्रिप्स’**, पोलीसांकडुन नागरीकांना चांगली सेवा मिळण्यासाठी **‘सेवाकार्य प्रणाली’**अशा प्रकारे विविध उपक्रम राबविलेले आहे. पुणे पोलीसांना गुन्हेगारी वृत्तीवर आळा बसण्यासाठी मा.पोलीस आयुक्त सो, पुणे शहर डॉ.श्री.के. व्यंकटेशम यांचे मार्गदर्शन होत आहे.

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर डॉ.श्री.के.व्यंकटेशम्व मा. पोलीसउप-आयुक्त, परिमंडळ-३, पुणे शहर श्री. मंगेश शिंदे यांचे मार्गदर्शना खाली दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या गुन्हेगारांवर वचक राहण्यासाठी व गुन्हे घडण्यास प्रतिबंध व्हावा याकरीता वारंवार गुन्हे करणारे, गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेण्याची विशेष मोहीम सुरु केली आहे. त्यामध्ये अशा गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली असुन गुन्हेगारांवर प्रतिबधंक कारवाई सुरु केलेली आहे.

पाहीजे असलेल्या गुन्हेगार यादीतील दत्तवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टरनं. ३५९/२०१६ भादवि क ३०७,३२५,१४३,१४६,१४६,१४७,१४८,१४९, म.पो.अधि.कलम ३७(१)सह १३५ मधील पाहीजे असलेला आरोपी किरण खवळे पुर्णनाव पत्ता नाही याचा शोध घेणे बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांना सुचना देऊन गुन्हे शोध पथक, सर्व्हेलंसचे कर्मचारी यांचे विशेष पथक स्थापन करण्यात आले.त्या प्रमाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांनी तपास पथकातील अधिकारी कर्मचारी यांना सुचना देऊन त्याचा शोध घेण्याबाबत सांगितले होते. त्यादरम्यान पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांना माहिती मिळाली की, किरण खवळे नावाचा आरोपी बिबवेवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टरनं. १८५/२०१९ भा.द.वि.कलम ३२६, ३४ या गुन्हयामध्ये अटक झालेला असुन तो सध्या येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे बंदीस्त आहे अशी माहिती प्राप्त होताच किरण खवळे याचे प्रोडक्शन वॉरंट मिळणे कामी न्यायालयाकडुन परवानगी घेऊन पोलीस उप-निरीक्षक राजु पवार, पोलीस कर्मचारी विकास कदम, राहुल ओलेकर यांना रवाना करुन त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह येथुन ताब्यात घेवुन दत्तवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टरनं. ३५९/२०१६ भादवि क ३०७,३२५,१४३,१४६,१४६,१४७,१४८,१४९, म.पो.अधि.कलम ३७(१)सह १३५या गुन्हयामध्ये अटककेली आहे. सदरचा आरोपी हा सुमारे ३ वर्षापासुन आपले आस्तित्व लपवुन राहात होता त्यास दत्तवाडी पोलीसांनी अटक केली. त्या आरोपीस मे. न्यायालयात हजर केले आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे, पोलीस उप-निरीक्षक राजु पवार, सहा. पोलीस फौजदार बाळासाहेब घावटे, पोलीस कर्मचारी विकास कदम, राहुल ओलेकर यांनी सहभाग घेऊन केलेली आहे.